# ८. भूगोल : स्वरूप व व्याप्ती

## थोडे आठवू या!

विद्यार्थी मित्रांनो, तुम्ही भूगोल विषयाचा अभ्यास इयत्ता तिसरीपासून परिसर अभ्यासातील एक भाग म्हणून, इयत्ता ६ वीपासून सामाजिक शास्त्रांतील एक भाग म्हणून आणि इयत्ता ११ वीपासून स्वतंत्र विषय म्हणून केलेला आहे. आपण ज्या ग्रहावर राहतो त्या 'पृथ्वी' ग्रहाच्या अभ्यासाची सुरुवात तुम्ही इयत्ता तिसरीमध्ये दिशांच्या अभ्यासापासून केली. त्यानंतरच्या शालेय वर्षांत तुम्ही अनेक भौगोलिक संकल्पना शिकलात. तुम्ही आत्तापर्यंत शिकलेल्या भौगोलिक संकल्पना आठवा आणि त्यांची यादी तयार करा. तसेच खाली दिलेल्या तक्त्यातील घटकांनुसार त्यांचे वर्गीकरण करा. तुमच्या माहितीसाठी प्रत्येक घटकातील एक संकल्पना उदाहरणादाखल सोडवून दिलेली आहे.

**तक्ता क्र.८.१**

| शिलावरणाशी संबंधित | जलावरणाशी संबंधित | वातावरणाशी संबंधित | जीवावरणाशी संबंधित | मानव आणि त्यांच्या क्रियांशी संबंधित | इतर संकल्पना |
|---|---|---|---|---|---|
| पर्वत | महासागर | हवामान | वनस्पती | शेती | नकाशे |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

## भौगोलिक स्पष्टीकरण

भूगोलाचा अभ्यास करताना तुम्ही पृथ्वीच्या प्राकृतिक पर्यावरणाबरोबरच मानवी क्रिया व त्यांचा परस्परांशी असलेला संबंध अभ्यासलेला आहे. पृथ्वीच्या भू-पृष्ठाचे स्वरूप सगळीकडे समान नसून पृथ्वीवरील अनेक घटकांमध्ये वैविध्यपूर्ण वैशिष्ट्ये आहेत. जसे, पर्वत, टेकड्या, मैदाने, पठारे, महासागर, नद्या, सरोवरे, वाळवंट अशा अनेक घटकांचा अभ्यास यामध्ये केला जातो. याशिवाय भूगोलामध्ये जागतिक व स्थानिक पातळीवरील हवामानाचे आकृतिबंध, त्यांचा वनस्पती जीवन व प्राणी जीवनावर पडणारा प्रभाव, मृदा आणि तिचे प्रकार इत्यादींचाही अभ्यास केला जातो. याशिवाय भूरूपांचे प्रकार, सागरतळ रचना, सागरी प्रवाह, क्षारता इत्यादींचाही अभ्यास भूगोल अभ्यासक करतात. या सर्व प्राकृतिक घटकांचा मानवी जीवनावर प्रभाव पडतो. परिणामी आपल्या सामाजिक व सांस्कृतिकतेमध्ये स्थळ व काळानुसार बदल झालेले दिसतात.

ही विविधता वस्त्या, वाहतुकींचे जाळे, बंदरे, बाजारपेठा आणि इतरही अनेक घटकांच्या स्वरूपात दिसते. हे घटक मानवाने त्याच्या सांस्कृतिक विकासाच्या कालखंडात निर्माण केलेले आहेत. भूगोल अभ्यासघटकांचे दोन मुख्य प्रकारांत विभाजन करता येते. प्राकृतिक घटक व मानवी घटक. यामुळे भूगोलाच्या प्राकृतिक भूगोल व मानवी भूगोल अशा दोन शाखांचा उगम झाला.

प्राकृतिक भूगोलात शिलावरणातील भूरूपे, जलप्रणाली, भूस्वरूप, भू-उठाव, वातावरणाचे घटक, रचना, हवा व हवामान, वारे, पर्जन्य, हवामान प्रकार, जलावरणातील सागर, महासागर, सरोवरे, नद्या इत्यादी घटकांचा आणि जीवावरणातील सजीवांमध्ये मानवासह सूक्ष्म जीव, परिसंस्था, अन्नसाखळी, परिस्थितीकीय संतुलन इत्यादींचा समावेश होतो. मानवी भूगोलात मानव आणि त्याचे पर्यावरणाशी असणारे संबंध आणि जगातील मानवाच्या सामाजिक व पर्यावरण विषयासंदर्भातील विविध गुणधर्मांच्या वितरणाचा अभ्यास केला जातो.

## विद्याशाखा म्हणून भूगोलाचे स्वरूप :

भूगोल म्हणजे पृथ्वी आणि तिच्याशी संबंधित मूलभूत घटकांचा अभ्यास होय. पृथ्वीवर सदैव परिवर्तन होते व तिच्या प्राकृतिक व सांस्कृतिक पर्यावरणात विविधता आढळते. भूगोल अभ्यासक या घटकांचे वितरण, त्यांचे प्रारूप व विविधतेचा अभ्यास करतात. याशिवाय त्यामागील कारणमीमांसेचाही अभ्यास करतात. थोडक्यात, वितरण आणि प्रारूप यांमधील कार्यकारणभाव जाणून घेणे हा भूगोल अभ्यासकांचा मुख्य हेतू असतो. उदा. विविध प्रदेशांतील विविध प्रकारची पिके यांच्या अभ्यासातून ते विविध हवामान, मृदा, बाजारातील मागणी, तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी घटकांचा सहसंबंध जाणून घेतात. प्रदेशाच्या अभ्यासातून त्या प्रदेशासाठी कोणत्या आर्थिक क्रिया सर्वांत योग्य आहेत हे ते सांगू शकतात.

'स्थळ', 'क्षेत्र' किंवा 'भौगोलिक स्थान' यांचाही अभ्यास भूगोलात करतात. तसेच प्राकृतिक अथवा मानवी भौगोलिक घटक स्थिर नसून गतिशील आहेत, काळानुसार ते बदलतात. उदा. एखाद्या ठिकाणच्या हवेच्या स्थितीचा दीर्घकाळ अभ्यास करून (साधारणतः ३० वर्षे) आपण त्या ठिकाणचे हवामान ठरवतो.

काही काळातील भारताची किंवा जगाची लोकसंख्या, भूरूपांची निर्मिती किंवा पृथ्वीचे वय इत्यादी विविध घटकांचा संबंध कालमानाशी असल्याने भूगोल अभ्यासकांना त्याविषयी स्वारस्य असते. अशा प्रकारे भूगोल म्हणजे 'स्थळ' आणि 'काळ' यांचा अभ्यास होय. ह्यामुळे भूगोलाचे स्वरूप गतिशील बनते. थोडक्यात, भूगोल अभ्यासक 'कुठे? केव्हा? काय? आणि का?' या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करतात.


### सांगा पाहू?

भूगोलाच्या अभ्यासातून प्राप्त केलेल्या कौशल्यांची यादी तयार करा. (सूचना – तुम्ही याकरिता या पुस्तकातील व मागील इयत्तांच्या पुस्तकातील अध्ययन निष्पत्ती पाहू शकता). आकृती ८.१ मध्ये काही उदाहरणे दिलेली आहेत.

### भौगोलिक स्पष्टीकरण

भूगोलाच्या अभ्यासासाठी आवश्यक कौशल्ये आणि पद्धती, विविध तंत्रे यांमुळे याविषयाचे स्वरूप प्रायोगिक आणि कृतिशील बनले आहे. या विषयाचा अभ्यास हा शास्त्रशुद्ध आहे व त्यास नेहमीच प्रयोगशीलता, माहिती, निरीक्षण प्रकार, माहितीचे विश्लेषण आणि संशोधन निष्कर्ष यांची जोड दिलेली असते. भूगोल विषय फक्त सिद्धांतावर आधारित नसून त्याला विविध साधने व तंत्रे याद्वारे माहिती संकलन, विश्लेषण यांवर आधारित पुराव्यांची जोड दिलेली असते.

सुरुवातीच्या काळात निरीक्षणातून भूगोलाच्या विकासास सुरुवात झाली. या विषयाचा मागील इतिहास पाहिला तर आपल्याला असे दिसून येईल की, आधीच्या भूगोल अभ्यासकांनी पृथ्वीचे वर्णनात्मक पुष्कळ लिखाण केलेले आहे. त्यामध्ये सर्वांत उल्लेखनीय कार्य ग्रीक तत्त्ववेत्ते हेकेटस (Hecataeus) यांचे आहे. त्यांचे पुस्तक 'गेस-पिरिऑड्स'(पृथ्वीचे वर्णन) हे इ.स.पूर्व ६ व्या शतकाच्या शेवटापूर्वी प्रकाशित झालेले असावे. यामध्ये सर्वांत प्रथम पृथ्वीचे पद्धतशीर वर्णन आहे. हे पुस्तक भूमध्य सागर, बेटे, सामुद्रधुनी यांची सखोल माहिती देते. त्याचबरोबर जगातील सर्व देशांच्या सामान्य आराखड्याचे वर्णन यात केलेले आहे. (आकृती क्र.८.२) टॉलेमीचे 'जिऑग्राफी' हे दुसरे एक महत्त्वाचे पुस्तक असून यात सामान्य वर्णनाबरोबरच




आकृती क्र.८.१

नकाशा पुस्तिकेचाही अंतर्भाव केलेला आहे. आणखी एक महत्त्वाचे पुस्तक म्हणजे रोमन तत्त्ववेत्ते स्ट्रॅबो यांनी लिहिलेले ‘जिऑग्राफीका’ हे पुस्तक भूगोल विषयाच्या माहितीचा ज्ञानकोश असून यात १७ खंडांचा समावेश आहे. (आकृती क्र. ८.३)


अशाप्रकारे भूगोल अभ्यासकांमध्ये, आवश्यक कौशल्यांमुळे पृथ्वीवरील मूलभूत घटकांच्या निरीक्षणाबरोबरच त्यांचे विश्लेषण करण्याची क्षमता निर्माण होते. भूगोल तज्ज्ञांच्या या कौशल्यामुळे नवनवीन शाखांचा विकास होऊन काळानुरूप भूगोल विषय अधिक समृद्ध झाला आहे.

**सांगा पाहू ?**

दिलेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने त्यांचे भूगोल विषयातील महत्त्व यावर चर्चा करा.

१) पर्यावरण विरुद्ध मानव

२) भारताचा संपूर्ण अभ्यास विरुद्ध भारतातील फक्त शेतीचा अभ्यास




आकृती ८.२ हेकेटस या ग्रीक भूगोल तज्ज्ञाने काढलेला नकाशा




आकृती ८.३ स्ट्रॅबो या रोमन तत्त्ववेत्याने काढलेला जगाचा नकाशा

## भौगोलिक स्पष्टीकरण

जेव्हा तुम्ही या मुद्द्यांनुसार चर्चा करता तेव्हा तुम्हांला असे जाणवले असेल की, भूगोलाच्या अभ्यासात दोन विरोधाभासी दृष्टिकोन आहेत. उदा. निसर्ग मानवावर अधिराज्य करतो की मानव निसर्गावर अधिराज्य करतो ? जेव्हा आपण भूगोल शिकतो तेव्हा आपण प्रदेशांचा अभ्यास करायचा की, प्रदेशातील विविध विभागांचा अभ्यास करायचा, हे काही प्रश्न आहेत, जे भूगोल अभ्यासकाला नेहमीच पडतात. याच विरोधाभासाला भूगोलातील दवंदववाद म्हणतात. याचा संदर्भ दोन परस्परविरोधी किंवा स्वतंत्र दृष्टिकोन यांच्याशी आहे. उदा. काही भूगोल तज्ज्ञांच्या दृष्टिकोनातून निसर्ग हा मानवापेक्षा श्रेष्ठ आहे, यास निसर्गवाद असे म्हणतात. तर काहींच्या मते मानव निसर्गावर ताबा मिळवू शकतो, यास संभाव्यवाद असे म्हणतात. या व्यतिरिक्त भूगोलात अनेक द्वैतवाद आहेत. त्यामुळे भूगोलाचे स्वरूप द्वैतवादी बनले आहे.

**व्याप्ती :**

### करून पहा.

भूगोलात आपण शिकलेल्या संज्ञा व संकल्पना खाली दिलेल्या आहेत. इतर विषयांत किंवा विद्याशाखेत तुम्ही शिकला असल्यास त्यांची नावे लिहा. या संकल्पना खालील तक्त्यात लिहा. चर्चा करून खालील तक्ता ८.२ पूर्ण करा.

**तक्ता क्र.८.२**

| संज्ञा/संकल्पना | अन्य विषय, ज्यामध्ये या संकल्पना आहेत |
|---|---|
| प्रक्षेपणासाठी आवश्यक असणारी आकडेमोड, प्रक्षेपणांचे आकार | |
| उपजीविकेची साधने – कृषी, उद्योग, व्यापार इत्यादी. | अर्थशास्त्र |
| उत्पादन खर्च, जीडीपी उत्पन्न, संसाधने, टंचाई इत्यादी. | |
| सामाजिक संबंध आणि विषमता | |
| मानवाची वांशिक संरचना, मानवाची उत्क्रांती इत्यादी | |
| खडक आणि खनिजे | |
| विभिन्न हवामान आणि प्राकृतिक रचनेतील मानवाचे वर्तन | |
| निवडणुकीचे मतदार संघ व मतदानाचे आकृतिबंध, शासन प्रणालीचे प्रकार | |
| जीवसंहती, अन्नसाखळी, वने इत्यादी | |
| रासायनिक विदारण, अपक्षरण, आम्लवर्षा इत्यादी | |
| सरासरी, फरक, सहसंबंध, प्रतिगमन (घट) इत्यादी | |
| अनेक ठिकाणांचा भूतकाळ, सद्य:स्थितीत येण्यापूर्वी झालेला विकास इत्यादी | |


**टीप** : तुम्हांला आवश्यकता वाटल्यास काही अतिरिक्त संकल्पनांचा समावेश करू शकता.

## भौगोलिक स्पष्टीकरण

आपल्या असे लक्षात येते की, नैसर्गिक आणि सामाजिक शास्त्रे यांतील सर्व विद्याशाखा भूगोलाशी निगडित आहेत. (आकृती ८.४ पाहा) भूगोलातील भूशास्त्र, हवामानशास्त्र, जलशास्त्र, मृदाशास्त्र हे अनुक्रमे प्राकृतिक भूगोलातील भूरूपशास्त्र, हवामान शास्त्र, सागर शास्त्र आणि मृदा भूगोल यांच्याशी निगडित आहेत. नकाशाशास्त्रीय तंत्रासाठी गणिताचे ज्ञान आवश्यक असते. तसेच नकाशा व आकृत्या काढण्यासाठीही गणिताचे सर्वसाधारण आकलन आवश्यक असते. माहितीचे विश्लेषण करण्यासाठी भूगोल तज्ज्ञ विविध संख्याशास्त्रीय तंत्रे आणि गृहीतकांच्या चाचण्या वापरतात.

सामाजिक शास्त्रातील प्रत्येक विषयाचा अभ्यास मानवी भूगोलात केला जातो. ज्यामध्ये प्रत्येक घटकाचा पृथ्वीवरील स्थान आणि वितरणाशी संबंध येतो. सामाजिक शास्त्रे जसे– समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, लोकसंख्या शास्त्र आणि इतिहास यांचा मानवी भूगोलातील सामाजिक भूगोल, राजकीय भूगोल, आर्थिक भूगोल, लोकसंख्या भूगोल आणि ऐतिहासिक भूगोल यांच्याशी निकटचा संबंध आहे.

वरील सर्व विवेचनावरून आपण असा निष्कर्ष काढू शकतो की, नैसर्गिक तसेच सामाजिक शास्त्रे यांच्याशी भूगोलाचा सहसंबंध आहे. त्याचबरोबर त्यातील प्रत्येक शाखेची स्वतंत्र व्याप्ती आहे. याचे कारण म्हणजे स्थळ–काळपरत्वे विषय घटक




**आकृती ८.४ भूगोलाचा अन्य विषयांशी असलेला सहसंबंध**

भिन्न असतात. भूगोल या विषयाने आपल्या मर्यादेनुसार इतर विषयांतून अनेक गोष्टी आत्मसात केल्या आहेत. मुख्य विद्या शाखांमधून भूगोलाच्या अनेक शाखा विकसित झाल्या आहेत. यामुळे भूगोल हा एकात्मिक आणि आंतरशाखीय विषय बनला आहे.

## भूगोलातील आधुनिक कल :–

भूगोलतज्ज्ञ मूलभूत घटकांचे स्पष्टीकरण कार्यकारणभावाच्या चौकटीत राहून करतात. त्याचा उपयोग माहितीचे संकलन आणि नमुन्यांच्या आधारे विदा विश्लेषणाबरोबर अंदाज वर्तविण्यासाठी होतो. त्यामुळे शाखीय अंतर्गत(आंतरशाखीय) कक्षा विकसित होऊन भूगोलाची व्याप्ती विस्तृत झाली आहे. भूगोलाच्या गतिमान स्वरूपामुळे या विषयात अनेक गोष्टींची भर पडत असते. दृक्श्राव्य माध्यम आणि माहिती तंत्रज्ञानामुळे माहिती स्रोत समृद्ध झाले आहेत. तंत्रज्ञान, संगणक आणि संगणक प्रणालीचा वापर यांमुळे माहितीचे संकलन, विदा विश्लेषण, विश्लेषण, सादरीकरण यामध्ये चांगल्या संधी उपलब्ध आहेत. भूगोलाच्या अभ्यासासाठी भौगोलिक माहिती प्रणाली (G.I.S.) आणि जागतिक स्थाननिश्चिती प्रणाली (G.P.S.) अनिवार्य आहेत. अलीकडे नकाशे G.I.S. च्या प्रणालीच्या आधारे तयार करतात. त्यामुळे संगणकाचे ज्ञान हे अतिरिक्त कौशल्य म्हणून भूगोल अभ्यासकाला आवश्यक आहे. ॲपचे उपयोजन आपल्या दैनंदिन जीवनात खूपच वाढलेले आहे. उपयोजित भूगोलामध्ये गणितीय प्रतिकृती व संगणकीय प्रतिकृती अलीकडे मोठ्या प्रमाणात वापरल्या जात आहेत. या प्रतिकृतींच्या आधारे भविष्यातील लोकसंख्येची वृद्धी आणि घनता, भूमी उपयोजन, शेतीकरणाचे प्रमाण, लोकसंख्येचे स्थलांतर, प्रारूप, औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि झोपडपट्ट्यांची वाढ याविषयी अंदाज वर्तविले जातात. त्याचप्रमाणे हवेच्या स्थितीचा अंदाज, हवामान बदल, समुद्र पातळीतील बदल, पर्यावरणातील प्रदूषण, मृदा अपक्षरण, निर्वनीकरण आणि भूआकारांची निर्मिती यांसाठी याचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. प्रगत सांख्यिकीय तंत्र आणि संगणक प्रणाली (Programmes) यांचा वापर भूपृष्ठीय आणि भौगोलिक घटकांच्या अभ्यासात आणि स्पष्टीकरणात आवश्यक विश्वसनीय माहिती संकलनासाठी केला जात आहे. संगणकावर वापरण्यात येणाऱ्या स्वरूपात माहिती पुरविल्यास त्याचा उपयोग भौगोलिक पर्यावरणातील अनेकविध घटकांचे

मोजमाप करण्यासाठी उपयोगी असतो.

अशा प्रकारे अफाट व्याप्ती असलेले आणि गतिमान बदल भूगोल विषयात होत असल्यामुळे भवितव्य घडविण्यासाठी आकर्षक पर्याय यामध्ये उपलब्ध आहेत. लोकप्रिय आणि आकर्षक विषय तसेच स्पर्धा परीक्षांसाठी चांगला माहितीचा स्रोत याशिवाय विविध हार्डस्किल्स व सॉफ्ट स्किल्स यांच्या संयोजनातून या विषयात भवितव्य घडविण्याच्या अनेक संधी उपलब्ध झालेल्या आहे. तक्ता क्र. ८.३ मध्ये भूगोलामध्ये भविष्यातील शक्यतांची यादी दिलेली आहे. यातील काही बाबतीत भूगोल विषयासोबतच इतर विषयांचे ज्ञानही अत्यावश्यक ठरते.


**तक्ता क्र.८.३**

| **भूगोलातील भविष्यातील संधी** | **भूगोल शाखेतील विशेष शाखा** |
|---|---|
| नकाशाकार | नकाशाशास्त्र, G.I.S. |
| हवामान बदल विश्लेषक, हवामान तज्ज्ञ | हवामानशास्त्र |
| लोकसंख्या शास्त्रज्ञ | लोकसंख्या भूगोल |
| भूअंतराळ विश्लेषक | G.I.S. |
| पत्रकारिता | भूगोलाची कोणतीही शाखा |
| सर्वेक्षक | नकाशाशास्त्र, मानवी भूगोल |
| नगर नियोजनकार | नागरी भूगोल |
| संशोधक | भूगोलाची कोणतीही शाखा |
| स्वतंत्ररीत्या काम करणारा (Freelancer) किंवा अनुदिनी (ब्लॉग) लेखन किंवा अहवाल लेखन किंवा प्रवास लेखन | भूगोलाची कोणतीही शाखा |
| आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञ | भूरूपशास्त्र/आपत्ती व्यवस्थापन |
| पर्यटन आयोजक/पर्यटन मार्गदर्शक (वाटाड्या) | मानवी भूगोल/पर्यटन व्यवस्थापन |
| विदाशास्त्रज्ञ आणि विश्लेषक जनगणना आणि संरक्षण खाते | संख्याशास्त्रीय भूगोल/ संगणकीय ज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, G.I.S. |
| सल्लागार | नकाशा तयार करणे, अहवाल लेखन इत्यादी विविध क्षेत्र |

भूगोलात अनेक संधी अशा उपलब्ध आहेत की, जे उद्योजक आणि स्वतंत्रपणे काम करणाऱ्यांसाठी प्रेरणादायक आहेत. पत्रकारिता, पर्यटन, अध्यापन, पुस्तक लेखन, अनुदिनी (ब्लॉग) लेखन, आशय लेखन, नकाशानिर्मिती सेवा तसेच इतरही अनेक क्षेत्रांमध्ये भूगोलाची पार्श्वभूमी असणाऱ्या व्यक्तींची आवश्यकता असते. भूगोलतज्ज्ञ पर्यावरण संवर्धन, जलप्रदूषण व नियंत्रण, जलसंवर्धन, पर्यावरण शिक्षण, शाश्वती, आरोग्य, नागरी शासन, वाहतूक नियोजन इत्यादी क्षेत्रांतही मोठ्या प्रमाणात काम करीत आहेत.

### करून पहा.

आकृती ८.५ मध्ये वर्तमानपत्रातील विशेष बातमी दिली आहे. नोकरीच्या संधींची यादी दिलेली आहे. ती यादी वाचा व त्यातील कोणती संधी भूगोल अभ्यासक म्हणून उपयुक्त आहे ते लिहा.



## रोजगाराच्या संधी

- **युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशन** – वर्ग-१ अधिकारी २०२० (मुलाखतीसाठी सूचना)
- **राष्ट्रीय ॲटलस एवं थिमॅटिक मानचित्रण संघटन, भारत उप महाप्रबंधक (नकाशा)**
  रिक्त पदे –२ (यापैकी १ पद खुले व १ पद राखीव)
  शैक्षणिक अर्हता MA/ M.Sc.
  भूगोल, कार्टोग्राफी पदविका मास्टर्स इन अर्बन प्लॅनिंग
  अनुभव – किमान पाच वर्षे
- **मुंबई महानगरपालिका नगर नियोजन विभाग–मुंबई**
  नगर नियोजनकार पद –१
  वर्ग–१ (खुले)
  कामाचे ठिकाण –मुंबई
  शैक्षणिक अर्हता
  MA, भूगोल
  किंवा
  M. Arch. किंवा M.A.
  नगररचना शास्त्र तसेच
  नगररचना शास्त्रातील पदवी.
  अनुभव – नगररचना
  व तत्सम कामाचा पाच वर्षांचा अनुभव
- **पद –साहाय्यक व्याख्याता**
  विषय – भूशास्त्र, भूगोल, इतिहास, ग्रामीण विकास
  एकूण पदे – चार, दोन खुली व दोन आरक्षित
  शैक्षणिक अर्हता – उपरोक्त विषयातील पदवी व पदव्युत्तर पदवी आवश्यक, NET/SET आवश्यक
  प्राधान्य – M.Phil. किंवा Ph.D.
- **संयुक्त राष्ट्रसंघ सेवा– कार्यक्रम**
  युनडीपी लिंग समानतेसाठी सल्लागार नेमणे
  ठिकाण – न्यूयॉर्क(यु.एस.ए.)
  भाषा – इंग्रजी व फ्रेंच,
  सुरुवात दिनांक – १६ मार्च २०२१
  करार कालावधी – १० महिने
  शैक्षणिक आर्हता : पदव्युत्तर पदवी (विकास अभ्यास/लिंग समानता अभ्यास/ समाजशास्त्र)
- **युपीएससी अभियांत्रिकी सेवापरीक्षा**
  (परीक्षा सूचना –२०२१)(आ.अ.से.)
  आर्हता – कोणत्याही शाखेची पदवी
  एकूण पदसंख्या – ४९५
  संकेतस्थळावर जाऊन अर्ज करणे.
  पहा संकेतस्थळ UPSC.in
- **बँकेत प्रोबेशनरी ऑफिसर सेवापरीक्षा**
  आर्हता : कोणत्याही शाखेची पदवी
  पदसंख्या : ५०
  ibps.in या संकेतस्थळावर जाऊन अर्ज करा.
- **युपीएससी संरक्षण दल सेवा पद अधिकारी**
  आर्हता : कोणत्याही शाखेची पदवी
  एकूण पद : १२३
  UPSC.in या संकेतस्थळावर जाऊन अर्ज करा.

**आकृती ८.५ : नमुना जाहिरात**

### भौगोलिक स्पष्टीकरण

तंत्रज्ञानाच्या वापरामुळे नवनवीन व्यवसाय सुरू करणेही शक्य झाले आहे.

भूगोल ही नैसर्गिक साधनसंपत्तीचे मूल्यांकन आणि व्यवस्थापन करणारी विद्याशाखा म्हणून उदयास आली. वरील ध्येय साध्य करण्यासाठी प्राकृतिक पर्यावरण आणि मानव यांच्यातील गुंतागुंतीचे नाते समजून घेणे आवश्यक आहे. प्राकृतिक पर्यावरणातून संसाधने पुरविली जातात, तर मानव या संसाधनांचा उपयोग करून आर्थिक आणि सांस्कृतिक विकास करून घेतो. तथापि, तंत्रज्ञानाच्या गतीमुळे आणि संसाधनांच्या अतिरिक्त वापरामुळे पर्यावरणीय असंतुलन निर्माण झाले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने दिलेली शाश्वत विकासाची ध्येये भूगोलाच्या विविध पैलूंशी संबंधित आहेत. शाश्वत विकासासाठी भूगोलाचे अधिक चांगले ज्ञान असणे आवश्यक आहे. ज्याद्वारे मानव आणि निसर्ग यांच्यातील संघर्ष टाळता येईल.

## स्वाध्याय

**प्र.१. अचूक गट ओळखा.**

१) अ) i)भूरूपशास्त्र
ii) हवामानशास्त्र
iii) जैव भूगोल
iv) ऐतिहासिक भूगोल

ब) i) नकाशाशास्त्र
ii) सर्वेक्षण
iii) माहिती संकलन
iv) GIS/GPS

क) i) पर्यटन
ii) वनसंवर्धन
iii) वन्य प्राणी संवर्धन
iv) संस्कृती संवर्धन

ड) i) राजकीय भूगोल
ii) प्राकृतिक भूगोल
iii) लोकसंख्या भूगोल
iv) आर्थिक भूगोल

**प्र.२. भौगोलिक कारणे लिहा.**

१) मानवी भूगोलाचे स्वरूप विभिन्न शाखांशी निगडित आहे.
२) भूगोल विषयाचे स्वरूप गतिशील आहे.
३) भूगोल विषयाचे स्वरूप द्वैतवादी आहेत.

**प्र.३. टिपा लिहा.**

१) प्राकृतिक भूगोल विज्ञानाच्या विविध शाखांमधील संबंध
२) भूगोलाच्या शाखा
३) भूगोलातील आधुनिक कल
४) भूगोल अभ्यासासाठी लागणारे कौशल्य

**प्र.४. सविस्तर उत्तरे लिहा.**

१) दैनंदिन जीवन जगताना आपल्याला भूगोलाचा कसा उपयोग होतो ते उदाहरणांसह स्पष्ट करा.
२) भूगोलाचा इतर विषयांशी असलेला संबंध स्पष्ट करा.
३) भूगोलाचे स्वरूप सविस्तर स्पष्ट करा.

**प्र.५. फरक स्पष्ट करा.**

१) प्राकृतिक भूगोल आणि मानवी भूगोल
२) निसर्गवाद आणि संभाव्यवाद

**प्र.६. सुबक आकृत्या काढा.**

१) भूगोलाचा अन्य विषयांशी संबंध
२) भूगोलाच्या अभ्यासासाठी लागणारे कौशल्य

***